पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक ११

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - ०१/११/२०१३ वेळ – दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ०१/११/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. काळजे नितीन प्रताप
८) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.खांडकेकर – सहा आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.जुंधारे – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१८) मुंबई पुणे रस्ता पिंपरी चौक ते निगडी डांबरीकरण, देखभाल व दुरुस्ती करणे.

विषय क्र.१९) मुंबई पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक डांबरीकरण, देखभाल व दुरुस्ती करणे.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.किरण मोटे

माजी महापौर सादबा ऊर्फ आप्पासाहेब काटे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून मा.विधी समिती सभा मंगळवार दिनांक १२/११/२०१३ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकुब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

( सर्वांनी दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

**मा.सभापती** - मंगळवार दिनांक १२/११/२०१३ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

मा.विधी समिती

कार्यपत्रिका क्रमांक ११

**सभावृत्तांत**

( दिनांक ०१/११/२०१३ ची तहकूब सभा )

दिनांक - १२/११/२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची दिनांक ०१/११/२०१३ ची तहकूब सभा मंगळवार दिनांक १२/११/२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा. जवळकर वैशाली राहुल - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. काळभोर वैशाली जालिंदर
४) मा. जाधव साधना रामदास
५) मा. प्रशांत शितोळे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. काळजे नितीन प्रताप
८) मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव
९) मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय मा.टेकाळे, मा.खांडकेकर – सहा आयुक्त, मा.गावडे – नगरसचिव, मा.दुधेकर, मा.दांगट, मा.सय्यद, मा.जुंधारे – कार्यकारी अभियंता, मा.पाटील – प्रशासन अधिकारी (प्रशा.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक ०४/१०/२०१३ व १८/१०/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १८/१०/२०१३ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१०)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : १२५ विषय क्रमांक : १

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा. शैलजा शितोळे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४१/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. सतिश कुलकर्णी, मुख्य अधिकारी गट अ यांचे सहा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत ....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२६ विषय क्रमांक : २

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/९४२/२०१३, दि.१६/०७/२०१३

विषय - श्री. ज्ञानेश्वर ढेरे, मुख्याधिकारी श्रेणी-१ यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील मुदतवाढीबाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक : १२७ विषय क्रमांक : ३

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.किरण मोटे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०४७/२०१३, दि.०३/०८/२०१३

विषय - श्री. गायकवाड भानुदास पांडूरंग, उपजिल्हाधिकारी यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत ...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक : १२८ विषय क्रमांक : ४

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/८११/२०१३, दि.२१/०६/२०१३

विषय - श्री. प्रमोद भीमराव भोसले, उपसंचालक, वित्त व लेखा सेवा (वरिष्ठ) गट-अ यांचे मुख्यलेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने केलेल्या नियुक्तीस मुदतवाढ मिळणेबाबत..

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १२९ विषय क्रमांक : ५

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : अ प्रभाग स्थापत्य

सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अप्र/स्था/३/१४९२/२०१३, दि.१३/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार निगडी से.क्र.२२ येथील गुरुदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणे या कामातून अ प्रभागातील इतर उद्यानांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३० विषय क्रमांक : ६
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : विद्युत मुख्य
सुचक : मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक : मा.प्रशांत शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.सशअ/३१५/२०१३, दि.२७/०८/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण मा.महापौर, सन्माननीय पदाधिकारी, शहरातील विविध कला क्षेत्रातील कलावंत आणि सांस्कृतिक संस्था यांच्या कडून प्राप्त झालेल्या सुचना / अभिप्राय विचारात घेऊन तयार करण्यात आले आहे. प्रस्तावा सोबतचे परिशिष्ट अ, ब, क, ड, इ, प, व फ प्रपत्रामध्ये नमुद सांस्कृतिक आणि कला धोरणास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३१ विषय क्रमांक : ७
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : भूमि आणि जिंदगी
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.शैलजा शितोळे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३, दि.०३/०९/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ प्रस्तावा सोबत नमुद केलेप्रमाणे (प्रारुप) तयार करणेत आलेली आहे त्यास तसेच मनपा मिळकत वाटप नियमावली २०१३ मधील भाग-५ मध्ये मिळकत विनियोगाचा प्राधान्यक्रम ठरविणेत आला आहे. तथापि सदर नमुद १ ते ७ प्राधान्य वर्गासाठी जाहिर निविदेद्वारे काही वर्गासाठी निविदा प्राप्त न झालेस किंवा कमी संख्येत प्राप्त झाल्यास इतर आरक्षीत वर्गासाठी त्या मिळकती वाटप करणेचे अधिकार मा.महापालिका सभेला असतील. यामध्ये ज्या आरक्षीत वर्गासाठी शासन निर्णय / आदेश असतील त्याला बाधा न येता मा.महापालिका सभेस निर्णय घेता येतील यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३२ विषय क्रमांक : ८
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५०/२०१३, दि.१३/०९/२०१३

विषय - जेष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.....

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३३ विषय क्रमांक : ९
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१२५७/२०१३, दि.१७/०९/२०१३

विषय - श्री. प्रशांत शरद खांडकेकर, मुख्याधिकारी (गट-अ) यांचे सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावरील नियुक्तीबाबत ....

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३४ विषय क्रमांक : १०
दिनांक : १२/११/२०१३
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर
संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/१/कावि/१४४५/२०१३, दि.०३/१०/२०१३
२) मा. क्रीडा समिती सभा दिनांक ०३/१०/२०१३ ठराव क्रमांक ४६ नुसार

प्रस्तावासोबत जोडणेत आलेल्या मनपा क्रीडा धोरण मसुद्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणेकामी शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३५ विषय क्रमांक : ११
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : नगररचना व विकास
सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नगररचना/१७/२७९/२०१३, दि.०८/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे तसेच निळी, लाल पुररेषा व नदीचे सर्वेक्षण करणे कामाच्या रक्कम रुपये २.५५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, पिंपरी चिंचवड मनपाचा जूना व नविन मंजूर विकास आराखडयातील सर्व आरक्षणे तसेच सर्व रस्ते, सर्व नद्यांबाजूची निळी व लाल पुर रेषा सर्वेक्षण करणे व अनुषंगीक कामे करणेच्या कामास र.रु.४,००,००,०००/- (अक्षरी र.रु.चार कोटी) चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३६ विषय क्रमांक : १२
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२८/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१३ बाबत.

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३७ विषय क्रमांक : १३
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.नितीन काळजे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/७/कावि/१०२९/२०१३, दि.१७/१०/२०१३

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका विभागांतर्गत आस्थापनेवरील सर्व पदांचा आढावा घेऊन नविन पदांच्या पद निर्मितीबाबत...

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३८ विषय क्रमांक : १४
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : ब प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.साधना जाधव अनुमोदक : मा.नितीन काळजे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बप्र/१३/कावि/५५/२०१३, दि.१०/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र.२८ मध्ये आण्णासाहेब मगर स्टेडियम येथील स्थापत्य विषयक व अनुषंगिक कामे करणेकामी येणा-या र.रु.३७,५०,०००/- ( अक्षरी र.रु. सदतीस लाख पन्नास हजार फक्त ) चे पुर्वगणनपत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १३९ विषय क्रमांक : १५
दिनांक : १२/११/२०१३ विभाग : ब प्रभाग स्थापत्य
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.निलेश बारणे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था/बप्र/०२/कावि/८५/२०१३, दि.१४/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब प्रभाग कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.२१ मधील परिसरातील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे (पान क्र.१८१ अ.क्र.८८) असे आहे. सदर कामास अंदाजपत्रक सन २०१३-१४ मध्ये २ लाख एवढी तरतूद असून अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४ लाख एवढी आहे. सदर कामास मा.स्थायी समिती मध्ये वाढीव तरतूद र.रु.६४,००,०००/- ठराव क्र.४१८८ दिनांक

२४/०९/२०१३ अन्वये मंजूरी मिळालेली आहे. सदर कामास अंदाजपत्रकीय रक्कम कमी पडत असल्याने र.रु.९९,००,०००/- चे खर्चास नव्याने प्रशासकीय मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १४० विषय क्रमांक : १६

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.किरण मोटे अनुमोदक : मा.नितीन काळजे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१३८६/२०१३, दि.१८/१०/२०१३

विषय - कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकीस मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १४१ विषय क्रमांक : १७

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : प्रशासन

सुचक : मा.शैलजा शितोळे अनुमोदक : मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशा/१/कावि/१४०६/२०१३, दि.२२/१०/२०१३

विषय - कार्यकारी अभियंता (विद्युत) पदावर पदोन्नतीने करावयाच्या नेमणुकीस मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : १४२ विषय क्रमांक : १८

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : स्थापत्य प्रकल्प

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.वैशाली काळभोर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था.प्रकल्प/जा/कावि/२८०/२०१३, दि.०५/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई-पुणे रस्ता पिंपरी चौक ते निगडी डांबरीकरण, देखभाल व दुरुस्ती करणेकामी येणा-या र.रु.१,४९,५८,३००/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणपन्नास लाख अठ्ठावन्न हजार तिनशे फक्त) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : १४३ विषय क्रमांक : १९

दिनांक : १२/११/२०१३ विभाग : स्थापत्य प्रकल्प

सुचक : मा.प्रशांत शितोळे अनुमोदक : मा.किरण मोटे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.स्था.प्रकल्प/जा/कावि/२७९/२०१३, दि.०५/१०/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई-पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक डांबरीकरण, देखभाल व दुरुस्ती करणेकामी येणा-या र.रु.१,४९,७६,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणपन्नास लाख शहात्तर हजार फक्त) पर्यंतचे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(जवळकर वैशाली राहुल)
**सभापती**
मा. विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १०६१ /२०१३
दिनांक - १३/११/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.